झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा-१/झोपुआ/९८६ /२०२५
दिनांक : २४/०९. /२०२५

**"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)"**
**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना -

पर्वती येथील फा.प्लॉट क्र.५२८/२६,५२८/२६अ, ५२८/२७, स.नं.१३२ पुणे येथील अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहे.

१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपुप्रा,पुणे हे सक्षम आहेत; आणि

२) ज्याअर्थी, अनुसूचीत निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२४/०९/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन सदरची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार नोव्हेंबर २८ ते ०४ डिसेंबर २०२४ मध्ये पृष्ठ क्र.११,१२ व १३ वर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२५/०९/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

३) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक यांना व एक प्रत माहितीस्तव मा.आयुक्त,पुणे महानगरपालिका, पुणे यांना देण्यात आली आहे. पूर्वसूचनेव्दारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३०दिवसांच्या आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्मविण्यात आले होते.

४) ज्याअर्थी, सदर नोटीसवर जागा मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती /संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/ हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरुपात सक्षम प्राधिकारी क्र.१ यांचेकडे सादर करणेबाबत फर्मविण्यात आले होते. सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाला आह. अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती संस्था कोणाचीही हरकत / तक्रार प्राप्त झालेली नाही.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मधील तरतुदीनुसार अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.२४/०९/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाव्दारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषीत करण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपिल दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : स.नं.१३२ फा.प्लॉट नं.५२८/२६, ५२८/२६अ व ५२८/२७,पर्वती,पुणे

महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका

| पेठ | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| पर्वती,पुणे | फा.प्लॉट नं.५२८/२६, ५२८/२६अ व ५२८/२७ स.नं.१३२ | खाजगी | १९८३.११ चौ.मी | पुर्वेस - फा.प्लॉ.५२८/२८<br>पश्चिमेस - फा.प्लॉ.५२८/२८ लागु जागेवर नसलेला रस्ता<br>दक्षिणेस - लागु कॅनॉल<br>उत्तरेस - लागु रस्ता | |

सदर क्षेत्रातील झोपडपट्टीमधील पात्र झोपडीधारकांचे पर्वती येथील फायलन प्लॉट ४८६ सी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये पुनर्वसन करण्याचे नियोजन आहे.

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २४/०१ /२०२५

(नीलेश गटणे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत -

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
३. व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती
४. विकसक मे.नमन एंटरप्रायजेस,सि.स.नं.११२५, शितल प्लाझा, हॉटेल अॅबेसेडर, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर,पुणे-०४